# १०. आप्पांचे पत्र

– अरविंद जगताप

मोबाईल एस. एम. एस. आल्यापासून पत्रलेखन दुर्मीळच नव्हे तर नष्ट होत चालले आहे. पत्रलेखनात शब्दांची मर्यादा नसते. पैशाची, खर्चाची मर्यादा नसते. पत्रलेखक आपल्या भावना त्यात ओतत असतो. वाचक त्या भावनांच्या वर्षावात चिंब होत असतो. भावनिक जिव्हाळ्यात तो न्हावून निघतो पण आजच्या या काळात हरवत चाललेल्या पत्रलेखनाला पुनरुज्जीवित करण्याचे काम लेखकाने केले आहे.

शाळेतील आपले लाडके शिपाईकाका विद्यार्थ्यांना पत्राछोर संदेश देत आहेत. कोणत्याही कामात यश मिळण्यासाठी कष्ट करा, प्रामाणिकपणे काम करा असा प्रामाणिक सल्ला ते देत आहेत. निसर्गसंपन्न भारत देशाचे स्वप्न ते तुम्हांला बघायला सांगत आहेत. अब्दुल कलामांसारखे आदर्श होण्याचा मंत्र ते तुम्हांला देत आहेत.